# १८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना:

प्रति,

**मा.सभासद**

निर्मिती नागरी सहकारी पतसंस्था मर्या,नाशिक

आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची अठरावी वार्षिक सर्वसाधारण सभा ----- वार दिनांक / २०१७ रोजी सायंकाळी ठिक ५:०० वा. -------------------------------------------------- येथे. मा.चेअरमन **आर्कि.सुरेश शामलाल गुप्ता** यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार करणेसाठी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी आपली उपस्थिती आवश्यक आहे.

**सभेपुढील विषय:**

१. मागिल वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २७/०७/२०१६ चे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दिनांक ३१ मार्च २०१७ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा संचालक मंडळाने तयार केलेल्या कामकाजाचा अहवाल वाचून त्यास मंजुरी देणे.
३. दिनांक ३१ मार्च २०१७ अखेरच्या ताळेबंद व नफा पत्रकांना मंजुरी देणे.
४. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या दि.३१ मार्च २०१७ अखेरच्या नफा वाटणीस मंजुरी देणे.
५. सन २०१७-२०१८ साठी शिफारस केलेल्या वार्षिक अर्थसंकल्पास मंजुरी देणे.
६. सन २०१६-२०१७चे अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
७. संस्थेचा सन २०१६-२०१७ चा लेखापरिक्षकांचा अहवाल वाचून त्यांची नोंद घेणे व संचालक मडळाने तयार केलेला दोषदुरूस्ती अहवालास मान्यता देणे.
८. एकरकमी परतफेड योजने अंतर्गत बंद झालेल्या थकित खात्यांची माहितीची नोंद घेणे व मंजुरी देणे.
९. मा.लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेली आणि १००% तरतुद असलेली संशयित व बुडित कर्जखाती वसुलीचे अधिकार अबाधित ठेवून निर्लेखित करण्यासठी मंजुरीबाबत निर्णय घेणे.
१०. सन २०१७-२०१८ च्या आर्थिक वर्षासाठी लेखापरिक्षकांची नेमणुक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
११. संस्थेची शहरात नविन शाख उघडणेबाबत.
१२. संस्थेसाठी ॲमेनिटी स्पेस/खुली जागा खरेदी बाबत विचार विनिमय करणे.
१३. मा.अध्यक्षांच्या पुर्व परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
(व्यवस्थापक)

**टिप:**

१. सभासदांच्या पाल्यांचा सत्कार अयोजित करण्यात येणार आहे, त्यासाठी सभासदांनी आपल्या पाल्यांची खालीलप्रमाणे मार्कशिटची सांक्षाकित झेरॉक्स प्रत दि. / /२०१७ पर्यत संस्थेच्या कार्यालयात आणुन द्यावी.
अ. दहावी ७५% व त्यावरी मार्क ब.१२ वी ७०% व त्यावरील मार्क क.पदवी ६०% व त्यावरील मार्क.
२. सभासदांनी त्यांच्या सुचना प्रश्न दि. / / २०१७ रोजी दु.४.०० वा.पर्यत पोहचतील अशा बेताने लेखी पाठवावेत.
३. गुणपुर्ती अभावी सभा तहकुब झाल्यास सभेचे कामकाज नियोजित वेळेनंतर त्याच दिवशी अर्ध्या तासाने विषयपत्रिकेप्रमाणे सुरू करण्यात येईल, त्यास गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.
४. दि. ३१/०३/२०१७ अखेरची आर्थिकपत्रके संस्थेच्या कार्यालयात पहावयास मिळतील.

**सभासदांना विनंती:**

१. सभासदांनी आपल्या पत्यात झालेल्या बदलाची त्वरीत नोंद करावी.
२. संस्था आपली आहे, संस्थेत आपले खाते नसल्यास खाते उघडुन घ्यावे व आपल्या परिचयातील लोकांनाही खाते उघडण्यास प्रवृत्त करावे.
३. सभासदांनी गरजेचे वेळी संस्थेकडून कर्ज घ्यावे व नियमितपणे परतफेड करावी. थकबाकीदारांच्या यादीत आपले नाव जाणार नाही याची काळजी घ्यावी. वसुलीसाठी कोर्ट करावाई, जप्ती, लिलाव या सारखे कटु मार्ग अवलंबविण्याचे प्रसंग कृपया पतसंस्थेवर आणू देवू नका.
४. लाभांशाची रक्कम यापुढे आपले बचतखाते, चालु खाते किंवा कर्ज खाते यामध्ये जमा करण्यात येईल. तरी आपले खाते नसल्यास खाते उघडावे. तसेच संस्थेचे मुळ शेअर्सची रक्कम २,०००/- करण्यात आली आहे आणि ज्या सभासदांची रक्कम कमी असेल त्यांनीत ती रक्कम रूपये २,०००/- करून संस्थेस सहकार्य करावे.
५. सभासदांनी शेअर्स सर्टिफिकेट संस्थेच्या कार्यालयातून घेउन जावेत हि विनंती.

**सन्माननिय सभासद बंधु आणि भगिनींनो, सप्रेम नमस्कार..**

बांधकाम व्यवसायाशी निगडीत व्यावसायिकांना अडचणीच्या काळात आर्थिक मदतीवर हात देण्यासाठी निर्मिती पतसंस्थेची स्थापना करण्यात आली, हे आपण जाणताच. बांधकाम व्यावसायीकांच्या कल्याणासाठी.. या ब्रिदाचे अवलोकन करीत आजपर्यंतचा निर्मितीचा प्रवास सुरू आहे. आज पहाता सतरा वर्ष पुर्ण होताहेत. या सतरा वर्षाच्या यशस्वी प्रवासात संस्थेचे सभासद, आर्किटेक्ट, बिल्डर्स, इंजिनिअर्स आणि मित्र परिवार व कुशल कर्मचारीवृंद तसेच अनेक शुभचिंतक यांची मोलाची साथ लाभल्यानेच निर्मितीने हे घवघवीत यश मिळविले आहे.

**ठेवी:-**

अहवाल वर्षात आपल्या संस्थेच्या ठेवी दिनांक ३१ मार्च २०१७ अखेर रू.११,७६,९५,०८९.६३ इतक्या असुन मागील वर्षाच्या तुलनेत ३ कोटी ०४ लाख ४९ हजार म्हणजेच ३५% वाढ झालेली आहे.

**ज्येष्ठ नागरिकांना मासिक व्याज विशेष ठेव योजना:-**

संस्थेच्या मुदत ठेव, मासिक व्याज, दामदुप्पट योजना असून या आकर्षक योजनांचा अधिकाधिक नागरिकांनी, खातेदांनी व ठेवीदारांनी लाभ घ्यावा, म्हणुन ज्येष्ठ नागरिकांना व विधवांना १३ महिन्यांच्या पुढील कालावधीसाठी ०.५% जास्त व्याजदर देत आहोत.

**लखपती ठेव योजना:-**

संस्थेच्या सभासदांकरिता आकर्षक लखपती ठेव योजना सुरू करण्यात आलेली आहे. या योजने अंतर्गत ठेवी ठेउन आपण योजनेचे मानकरी होउन लखपती होउ शकतात. या योजनेचा फायदा सर्व सभासदांनी घ्यावा.

**कार्यक्षम व्यवस्थापन आणि नियोजन:-**

कुठल्याही संस्थेच्या विकासासाठी कार्यक्षम व्यवस्थापन आणि कुशल नियोजनाची आवश्यकता असते. बँकिंग क्षेत्रातील दिवसें दिवस वाढत चाललेल्या स्पर्धाच्या काळात व नोट बंदीच्या काळात निर्मिती ने विशेष लक्ष पुरवून व्यवस्थापनात उत्तम कार्यक्षमता आणण्याचा पुरेपुर प्रयत्न केला आहे. यासाठी विशेष करून कॉस्ट ऑफ कमी करणे, लो कॉस्ट डिपॉझिटस मोठया प्रमाणावर जमा करणे, उत्पन्नात वाढ करणे आणि एनपीए रेशो कमी करणे या बाबत संचालक मंडळ नियमित सतर्क आहे. आगामी काळातही कुशलता वाढविण्यासाठी संस्थेची स्वत:ची वास्तु घेण्यासाठी संचालक मंडळ प्रयत्नशील आहे.

**पारदर्शी व्यवहार:-**

ग्राहक हिताची जपणुक करणे हे कोणत्याही बँकेचे किंवा संस्थेचे कर्तव्य आहे. ग्राहक हा केंद्र बिंदु मानून संस्थेचा व्यवहार पारदर्शी असणे गरजेचे असते. आपल्या ग्राहकांची विश्वासार्हता वाढविण्यासाठी आणि ती टिकविण्यासाठी निर्मिती पतसंस्था सर्वच आघाडयांवर खरी उतरली आहे. आपल्या पारदर्शी धोरणाने निर्मितीने ग्राहक वर्गात आपला ठसा निश्चितच उमटविला आहे. सहकार क्षेत्रात निर्मिती पतसंस्थेचे बळकट स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे. यासाठी ग्राहकांना संस्थेच्या व्यवहारांबाबत जागरूक ठेवणे, सुसष्टपणे सविस्तर माहिती पुरविणे या माध्यमातुन निर्मिती आपला पारदर्शी व्यवहार ग्राहकांसमोर नियमित ठेवत आली आहे.

सभासदांच्या आर्थिक अडचणी सोडवणूकीचे ब्रिद ध्यानात ठेवूनच सहजसुलभ पध्दतीने कर्ज निधी उपलब्ध करण्याचे धोरण निर्मितीने प्रारंभापासूनच अवलंबिले आहे. निर्मिती पतसंस्थेने सांभाळलेली व्यावसायीक मुल्ये आणि ती जपण्यासाठी संस्थेने स्वत:साठी आखून घेतलेली दिशादर्शक आचार संहिता, यामुळे निर्मिती पतसंस्था सर्वाच्या कसोटीवर खरी उतरली आहे. व्यावसायीक हितसंबंध जोपासतांना ग्राहक व सभासदांचे हित जतन करतांना सामाजिक मुल्यांनाही आचारणात आणले जाते. रजिस्टर गहाणखत करूनच कुठलेही कर्ज वितरीत केले जाते, यासाठी कुठलाही समझोता संस्था करीत नाही.

**प्रशासकिय खर्चात काटकसर:-**

गेल्या बारा वर्षापासून आर्थिक खर्चात काटकसर करण्याचा यशस्वी प्रयोग पतसंस्थेने केला आहे. प्रशासकीय खर्चात योग्य ठिकाणी काटकसर करत असतांनाच काही महत्त्वाच्या खर्चात योग्य ती काटकसर करण्यात संस्थेला यश आलेले आहे, या धोरणाला पाठिंबा देत संचालक मंडळ कुठल्याही प्रकारचा मिटिंग भत्ता घेत नाही. संचालक मंडळा सोबतच या काटकसरीचे अवलोकन निर्मितीचा कर्मचारीवृंद जाणीवपुर्वक करीत असतो.

**सभासद:-**

सभासद संख्येत घट झाल्याची दिसत असून अहवाल वर्षात ३५ नविन सभासद नोंदविले असून ज्या सभासदांनी रू.२,०००/- भागभांडवल पुर्ण केले नाही म्हणुन स्वइच्छिने राजीनामे दिले आहे त्यांचे राजीनामे मंजुर करण्यात आले असून ३१/०३/२०१७ रोजी २४७ सभासदांनी राजीनामा दिलेला असून सभासद संख्या ६६३ झाली आहे.

**भाग भांडवल-**

संस्थेच्या भागभांडवलाची मर्यादा १ कोटी रूपये असून ३१ मार्च २०१६ अखेर संस्थेचे भागभांडवल रू.४३,९४,९५०/- इतके होते. अहवाल वर्षात ३१ मार्च २०१७ अखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रू.५२,८३,०५०/- इतके झाले म्हणजेच अहवाल वर्षात भागभांडवल रू.८,८८,१००/- म्हणजेच २०.२०% ने वाढ झालेली आहे.

**इमारत निधी:-**

अहवाल वर्षात इमारत निधी रू.४२,०८,५९६.८५ इतका आहे.

**रिझर्व्ह फंड:-**

अहवाल वर्षात आपल्या संस्थेचा रिझर्व्ह फंड रू.९,०९,२९२/- इतक्याने वाढ होउन दिनांक ३१ मार्च २०१७ अखेर रक्कम रू.४७,२३,७७०.०१ इतका झाला आहे.

**आर्थिक स्थिती:-**

संस्थेची एकुण व्यवहार सन २०१६-२०१७ मध्ये १६ कोटी पेक्षा जास्त झाला आहे. गतवर्षीच्या तुलनेत एकुण व्यवहारात ५०% वाढ झालेली आहे. चालू आणि बचत खात्यातील ठेवी रू.९५ लाखाहुन अधिक आहेत आणि अहवाल कालावधीत संस्थेने निव्वळ नफ्याचा रू.५४ लाखाचा टप्पा गाठला आहे.

| तपशील | ३१/०३/२०१६ | ३१/०३/२०१७ | (+) वाढ /(-) घट |
|---|---|---|---|
| एकुण व्यवसाय | १० कोटी ८७ लाख | १५ कोटी १३ लाख | (+) ४ कोटी २६ लाख |
| ठेवी | ८ कोटी ७२ लाख | ११ कोटी ७६ लाख | (+) ३ कोटी ०४ लाख |
| कर्ज | ५ कोटी ८९ लाख | ९ कोटी २६ लाख | (+) ३ कोटी ३७ लाख |
| गुंतवणुक | ३ कोटी ६७ लाख | ४ कोटी ८० लाख | (+) १ कोटी १३ लाख |
| निव्वळ नफा | ३३ लाख ८८ हजार | ५४ लाख ८ हजार | (+) २०लाख २० हजार |

**ठेवी -ठेवीचा तपशील खालीलप्रमाणे-**

| तपशील | ३१/०३/२०१६ | ३१/०३/२०१७ | (+) वाढ /(-) घट |
|---|---|---|---|
| चालु खाते | ९ लाख ८ हजार | १२ लाख ९ हजार | (+) ३ लाख १ हजार |
| बचत खाते | ६२ लाख ६७ हजार | ८२ लाख २९ हजार | (+) १९ लाख ६२ हजार |
| मुदत ठेव खाते | १ कोटी ८० लाख | २ कोटी २० लाख | (+) ४० लाख |
| मासिक ठेव खाते | ५ कोटी ८९ लाख | ८ कोटी २९ लाख | (+) २ कोटी ५० लाख |
| लखपती ठेव खाते | २२ लाख ७२ हजार | २२ लाख ३२ हजार | (-) ४० हजार |
| दामदुप्पट ठेव खाते | ८ लाख ३१ हजार | ९ लाख ३६ हजार | (+) १ लाख ५ हजार |
| एकुण ठेवी | ८ कोटी ७२ लाख | ११ कोटी ७६ लाख | (+) ३ कोटी ४ लाख |

**कर्ज-तपशिल खालीलप्रमाणे-**

| तपशील | ३१/०३/२०१६ | ३१/०३/२०१७ | (+) वाढ /(-) घट |
|---|---|---|---|
| टर्म लोन | ४ कोटी ६२ लाख | ६ कोटी ९१ लाख | (+) २ कोटी २९ लाख |
| हायपोथिकेशन | २९ लाख १७ हजार | १९ लाख ०७ हजार | (-) १० लाख १० हजार |
| मुदत ठेव कर्ज | ९६ लाख ३१ हजार | १ कोटी ४९ लाख | (+) ५३ लाख |
| पर्सनल लोन | ८ लाख ३१ हजार | १ लाख ४५ हजार | (-) ६ लाख ८६ हजार |
| हायपोसिसि कर्ज | - | १० लाख ७६ हजार | (+) १० लाख ७६ हजार |
| गृह कर्ज | - | ५३ लाख ६३ हजार | (+) ५३ लाख ६३ हजार |

| | | | |
|---|---|---|---|
| एकुण कर्ज | ५ कोटी ८९ लाख | ९ कोटी २६ लाख | (+) ३ कोटी ३७ लाख |

**अनुत्पादित कर्ज:-**

| तपशील | ३१/०३/२०१६ | ३१/०३/२०१७ | (+) वाढ /(-) घट |
|---|---|---|---|
| निव्वळ अनुत्पादित कर्जाचे एकुण कर्जाशी प्रमाण | ४.१९% | ३.८३% | (-)०.३६% |
| नेट एनपीए | | | ० % |

**गुंतवणुक :-**

पतसंस्थेने अहवाल वर्षात एकुण **रू.४,८०,५३,९४८.००** गुंतवणुक खालील प्रमाणे केला आहे.

| तपशील | रक्कम |
|---|---|
| जनकल्याण को-ऑप बँक लि. | **२,००,२२,४४८.००** |
| विश्वास को-ऑप बँक लि. | **१,५५,२५,०००.००** |
| श्री.समर्थ बँक लि. | **७५,००,०००.००** |
| राजलक्ष्मी अर्बन को-ऑप बँक लि. | **५०,००,०००.००** |
| एन.डी सी.सी बँक शेअर्स | **५,०००.००** |
| फेडरेशन शेअर्स | **५००.००** |
| श्री.गुरूजी रुग्णालय | **५००.००** |

**विमा:-**

संस्थेने मालमत्तेचा व इतर जोखमीचा विमा उतरविला आहे.

ज्या सभासदांचे भागभांडवल रू.२०,०००/- किंवा त्यापेक्षा जास्त आहे अशा सभासदांचा पंतप्रधान विमा योजने अंतर्गत रक्कम रू.१२ व रू.३३०/- देणेबाबतचा मानस संचालक करीत आहे.

**ई-फ्रॅंकिंग सुविधा-**

संस्थेने सभासदांच्या सोयीसाठी ई-फ्रॅंकिंग सुविधा सुरू केलेली असून सदरची ई-फ्रॅंकिंग हि सुविधा अल्पदराने असल्याने सदर सुविधांचा लाभ बँका, ॲडव्होकेट व इतर मान्यवर घेत आहे.

**एसएमएस सुविधा-**

संस्थेने सभासद व खातेदारांच्या सोयीसाठी एसएमएस सुविधा सुरू केलेली आहे, सदरची सुविधासाठी कुठलेही चार्जेस संस्था लावीत नाही. सर्व सभासदांना व खातेदारांना व्यवहार व खात्यासंबंधीचे व्यवहाराची माहिती एसएमएस व्दारे होत आहे.

**संचालक मंडळ सभा:-**

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या सभा खेळीमेळीच्या वातावरणात झाल्या असून सर्व निर्णय एकमताने घेण्यात आले. तसेच आपल्या संस्थेचे संचालक मंडळ हे विश्वस्तांच्या भुमिकेतुन स्वत:ची कामे बाजुला ठेवून आपली जबाबदारी पार पाडीत आहेत.

**संस्थेची मागील ३ वर्षाची तुलनात्मक सांपत्तिक स्थिती-**

| अ.क्र | तपशिल | २०१४-२०१५ | २०१५-२०१६ | २०१६-२०१७ |
|---|---|---|---|---|
| १. | सभासद संख्या | ८८० | ८७५ | ६६३ |
| २. | भागभांडवल | ४१,०७,६००.०० | ४३,९७,९५०.०० | ५२,८३,०५०.०० |
| ३. | निधी | ६६,५८,३९२.३२ | ९४,८८,१६४.२२ | १,२३,५९,११७.६९ |
| ४. | ठेवी | ७,९०,१९,०४३.३३ | ८,७२,४५,८८८.१६ | ११,७६,९५,०८९.६३ |
| ५. | कर्ज | ५,४९,३५,५९४.०० | ५,८९,४५,९७६.०० | ९,२६,३३,९३५.०० |
| ६. | गुंतवणुक | ३,१४,५५,८५६.०० | ३,६७,३४,३८५.०० | ४,८०,५३,९४८.०० |
| ७. | नफा | ३०,२०,५५५.९० | ३३,८८,३१५.४७ | ५४,०८,३१७.३२ |
| ८. | लाभांश | १४% | १४% | १४% |
| ९. | ऑडिट वर्ग | अ | अ | अ |

**संस्थेस मान्यवरांच्या सदिच्छा भेटी आणि आभार**

संस्थेच्या प्रगतीत माझे सहकारी संचालक यांच्या सहकार्याचा मोठा वाटा आहे. संस्थेचे कामकाज करतांना समाजातील अनेक घटकांचा हातभार लागतो व त्यांच्या अल्पशा मदतीने देखील संस्थेची प्रगती होत असते. त्यांच्यामुळेच संस्थेची वाटचाल यशस्वी झालेली आहे. त्यांचे मन:पुर्वक आभार. संस्थेचे सभासद, ठेवीदार, हितचिंतक, मित्रपरिवार यांनी दिलेल्या सहकार्याद्दल आभार. तसेच संस्थेचा कर्मचारी वर्ग यांनी संस्थेच्या प्रगतीत सतर्क राहुन जे कर्तव्य पार पाडले यापुढेही ते असेच कर्तव्य पार पाडतील अशी अपेक्षा ठेउन त्यांचेहि आभार व्यक्त करतो या पुढेही आपणासर्वाच्या सहकार्याची साथ संस्थेस मिळत राहिल हिच मनोकामना..

**नफावाटणी-**

संचालक मंडळाची प्रशासन खर्चात नेहमीच काटकसर करण्याची पध्दत व सेवकांकडून कर्जदार, ठेवीदार तसेच हिंतचिंतकांना मिळणारी सन्मानाची वागणूक हया सगळयांचा परिपाक म्हणून अहवाल वर्षात संस्थेस रू.५४,०८,३१७.३२ इतका नफा झला आहे. संचालक मंडळाने पुढीलप्रमाणे नफा वाटणी सुचवलेली आहे. त्यास माननिय सभासदांनी मान्यता द्यावी हि विनंती.

**लक्षवेधी...**

संस्थपाक अध्यक्ष आर्कि.सुरेश गुप्ता यांच्या महत्वाकांक्षी संकल्पनेतून सातपुर येथील कामगारवर्गातील मुलींसाठी विशेष प्रयत्न करतांना बेटी पढाओ अभियान ही संकल्पना राबविण्यास सुरुवात

केली आहे. श्री.शामलाल गुप्ता हिंन्दी माध्यमिक विदयालयात या योजनेअंतर्गत गरजू मुलींना दत्तक घेण्यात येते. रू.१,०००/- प्रतिवर्षी देणगी देउन आपणही एका मुलीस दत्तक घेउन, एका मुलीचेच नव्हे तर कुटुंबाचे उज्वल भवितव्य घडवू शकता. तरी सुजान नागरिकांनी अधिकाधिक संख्येने बेटी पढाओ अभियानचे प्रेरक म्हणून कृतीशील सहभाग नोंदवावा, असे आम्ही आवाहन करीत आहोत.

यावर्षी या अभियानांतर्गत आपल्या संस्थेचे संचालक श्री.मधुकर फटांगरे, श्री.के.डी पाटील यांनी बेटी पढाव योजने अंतर्गत १० मुलींना दत्तक घेतले. संस्था त्यांची आभारी आहे. आपणही अश्या प्रकारे आपला सहभाग नोंदवाला, हिच अपेक्षा.

**निर्मिती फोरम..**

निर्मिती नागरी सहकारी पतसंस्थेने आपला सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील सातत्यपुर्ण सहभाग वाढविण्याकरिता निर्मिती फोरम ची स्थापना केली आहे. या व्यासपीठावरून भविष्यात चांगले नागरिक घडविण्यासाठी आणि सुदृढ समाज निर्मितीसाठी कार्यक्रम राबविण्याचा निर्मिती फोरम चा मानस आहे. या निमित्ताने भविष्यातील नियोजित काही उपक्रम आपल्या नोंदीसाटी येथे अधोरेखीत करत आहोत.

नाशिकमधील उच्च शिक्षण घेणाऱ्या तसेच शिक्षणासाठी परदेशी जाणा-या विदयार्थ्यांना मार्गदर्शन करून प्रोत्याहित केले जाणार आहे. या निमित्ताने गरजू विदयार्थ्यांना अनुभवी आणि तज्ञ मार्गदर्शकांमार्फत योग्य सल्ला देण्यात येईल. जेणेकरून या विदयार्थ्यांना आपले करिअर उभे करण्यास हातभार लागेल. आपणही आपले या विषयी अनुभव शेअर करून या व्यासपिठाची शोभा वाढवावी असे नम्र आवाहन आपणांस करण्यात येत आहे.

नाशिक महानगरी ही एक पौराणिक नगरी आहे, या नगरीच्या रचनेत नाशिकमधील वास्तुविशारदांचा अर्थात आर्किटेक्टसचा मोठा हातभार आहे. या निमित्ताने निर्मिती फोरम, इंडियन इन्स्टिटयूट ऑफ आर्किटेक्टस (आय.आय.ए) नाशिक सेंटर व निर्मिती पतसंस्थेच्या संयुक्त विदयमाने दरवर्षी नाशिक मधील एका ज्येष्ठ आर्किटेक्टला सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्कारात रू.२१,०००/- चा समावेश असेल तसेच हीच परंपरा आधुनिक पध्दतिने भविष्यातही पुढे नेण्यासाठी युवा आर्किटेक्टसना प्रोत्साहीत केले जाणार आहे. या वर्षापासून एका युवा आर्किटेक्टला रू.११,०००/-च्या पुरस्कार देउन प्रोत्साहित केले जाणार आहे. आपणांस कळविण्यास अत्यानंद होतो आहे की, मागील वर्षी नाशिकचे ज्येष्ठ आर्किटेक्ट व मार्गदर्शक, आर्कि.विश्वास (विसुभाउ) पाटणकर यांना स्न्मानित करण्यात आहे, त्याच प्रमाणे यावर्षी आर्किटेक्ट श्री.----------------------- यांना ज्येष्ठ आर्किटेक्ट सत्मानाने गौरविण्यात येणार आहे. लवकरच या आनंद सोहळयाचे निमंत्रण आपणांस पाठविण्यात येईल.

आज दिवसेदिवस मानवाचे आरोग्य धोकेदायक ठरत चालले आहे मानवी जीवनाचे मोल जपण्यासाठी केंद्र सरकारने जनसामान्यांचे आरोग्य अबाधित करणाचा प्रयत्न म्हणून केवळ ३३०/- रूपयात व १२/- रूपयात केंद्र शासनाने प्रधानमंत्री विमा योजना व अपघाती विमा योजना घोषित केली आहे. या योजनांचा प्रचार व प्रसार करून, संस्थेच्या कर्जदार सभासदांचा या योजनेत समावेश करण्यात येणार आहे. या निमित्ताने कर्जदार सभासदांचा या योजनेत समावेश करण्यात येणार आहे. या निमित्ताने कर्जदार व संबंधितांना सुमारे दोन लाखांपर्यतच्या विमा रकमेचे उपचार उपलब्ध होउ शकतात. जर सभासदांनी बँकातून हया विमा योजना काढल्या असतील तर रक्कम कपात झालेल्या आपल्या बँकेतील खात्याचा उतारा आपल्या संस्थेकडे सुपुर्द केल्यास अशा सभासदांना सदरची रक्कम देण्यात येणार आहे. म्हणजेच त्या सभासदाचा विमा हा संस्थेकडून काढून घेण्यात येईल व त्याचा लाभ सभासदांना होईल. सदरची

योजना हि फक्त ज्या सभासदांचे भाग हे २०,०००/- व त्यावरील आहे त्यांनाच हया योजनेचा लाभ घेता येईल.

भविष्यात निर्मिती फोरम नाशिककरांसाठी एक सामाजिक, सांस्कृतिक आयामाचे सर्वाचे व्यासपीठ म्हणून नावारूपाला आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. आपणही या कार्यात हातभार लावावा, हिच या निमित्ताने सदिच्छा..

**लाभांश:-**

आपणांस कळविण्यात अत्यंत आनंद होत आहे की, निर्मिती पतसंस्थेच्या या यशस्वी घोडदौडीचे आपण साथीदार आणि साक्षीदार आहात. म्हणूनच या वर्षी दिनांक ३१ मार्च २०१७ अखेर असलेल्या भागभांडवलावर १४% प्रमाणे लाभांश सभासदांना देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे. संस्थेच्या या घोषणेचे आपण स्वागत करून मंजुरी दयाल अशी खात्री आहे. मागील सहा वर्षापासून १४% लाभांश देण्याचे सातत्य संस्थेने ठेवलेले आहे.

**नफा:-**

संस्थेने काटकसरीचे धोरण, व्यवहारातील पारदर्शकता, कर्ज वितरण करतांना तपासले जाणारे सामाजिक भान या सोबतच पतसंस्थेच्या सेवकांकडून उपलब्ध असलेली विनम्र सेवा, सन्मानाची वागणुक या सर्व बाबीचे फलित म्हणजेच या आर्थिक वर्षात संस्थेस **रू.५४,०८,३१७.३२** इतका नफा झाला आहे. सभासद, ठेवीदार, कर्जदार व कर्मचारीवृंद यांच्या सोबत संचालक मंडळ अभिनंदनास पात्र आहेत.

| अ.क्र | तपशिल | एकुण नफ्याची वाटणी टक्केवारी | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | रिझर्व्ह फंड | २५% टक्के | १३,५२,०७९.०० |
| २. | लाभांश | १४% लाभांश (११.९०%) | ६,४३,८५०.०० |
| ३. | संशयित बुडीत कर्ज निधी | ३१.४३% | १७,००,०००.०० |
| ४. | इमारत निधी | १८.४९% | १०,००,०००.०० |
| ५. | धर्मदाय निधी | ५.५५% | ३,००,०००.०० |
| ६. | सभासद कल्याण निधी | ७.६३% | ४,१२,३८८.३२ |
| **एकुण** | | **१००%** | **५४,०८,३१७.३२** |

निर्मितीच्या या नेत्रदिपक यशामध्ये माजी अध्यक्ष श्री.मधुकर भागाजी फटांगरे, उपाध्यक्ष श्री.प्रताप बेडसे, जनसंपर्क संचालक श्री.सुहास शुक्ल, संचालक श्री.के.डी पाटील, श्री.ओमप्रकाश जाजु व इतर संचालक मंडळ तसेच संस्थेचा तत्पर कर्मचारीवृंद यांच्या सहकर्यानेच हे यश संपादन करू शकलो, यासाठी मी सर्वाचे आभार मानतो, धन्यवाद।।

# दिनांक ३१ मार्च २०१७ अखेरचा ताळेबंद

| ३१/०३/२०१६ | भांडवल देणी | ३१/०३/२०१७ |
|---|---|---|
| १,००,००,०००.०० | अधिकृत भाग भांडवल<br>१० रू.चे १०,०००<br>१०० रू चे ९९,००० | १,००,००,०००.०० |
| **४३,९७.९५०.००** | **वसुल भाग भांडवल** | **५२,८३,०५०.००** |
| **९४,८८,१६४.२२** | **निधी** | **१,२३,५९,११७.६९** |
| ३८,१४,४७८.०१ | राखीव निधी | ४७,२३,७७०.०१ |
| ३३,४६,९३५.३८ | इमारत निधी | ४२,०८,५९६.८५ |
| २३,०१,७५०.८३ | संशयीत व बुडीत कर्ज | ३३,०१,७५०.८३ |
| २५,०००.०० | धर्मदाय निधी | १,२५,०००.०० |
| **८,७२,४५,५८८.१६** | **ठेवी** | **११,७६,९५,०८९.६३** |
| १,८०,४४,७५८.०० | मुदत ठेव | २,२०,८८,४२०.०० |
| ५,६६४.०० | रिकरिंग ठेव | ५,६६४.०० |
| ६२,६७,७९५.४० | बचत ठेव | ८२,२९,२२३.३६ |
| ९,०८,७६९.७६ | करंट ठेव | १२,०९,३५०.२७ |
| ८,३१,८०८.०० | दामदुप्पट ठेव | ९,३६,४५७.०० |
| ११,५००.०० | लोन लिंकिंग ठेव | ११,५००.०० |
| १,५००.०० | दामदिडपट ठेव | १,५००.०० |
| ५,८९,०१,०१६.०० | मासिक व्याज प्राप्ती ठेव | ८,२९,८१,८२२.०० |
| २२,७२,७७७.०० | लखपती ठेव योजना | २२,३२,६५३.०० |
| **३२,८५,०४७.००** | **तरतुद** | **३६,००,२३१.८०** |
| १,३०,८७५.०० | ऑडिट फि देणे | ८४,३०६.८० |
| २४,२६,७९६.०० | व्याज देणे | २७,९३,६४९.०० |
| १,६००.०० | टेलिफोन देय | ०.०० |
| १५,०००.०० | शिक्षण निधी | २०,०००.०० |
| २३,५००.०० | महानगर पालिका टॅक्स | ०.०० |
| ६,७१,७७६.०० | एनपीए ऑन प्रिसीपल | ६,७१,७७६.०० |
| १५,५००.०० | टॅक्स ऑडिट फि | ३०,५००.०० |
| **८,९३,००२.००** | **इतर देणी** | **१०,८५,५६६.००** |
| १३,०००.०० | अनामत देणे | १३,०००.०० |
| ७,५३,४३७.०० | ओव्हरडयु इंन्ट्रेस्ट रिव्हर्स | ७,५३,४३७.०० |
| २७,६४०.०० | संन्ड्री क्रेडिटर्स (इतर देणे) | २,२७,६४०.०० |
| ४२,७३२.०० | लाभांश देणे १४-१५ | ४२,४५२.०० |
| ०.०० | टिडीएस देणे | ७,४३९.०० |
| ०.०० | लाभांश देणे १५-१६ | ४१,५९८.०० |
| ३७,९५३.०० | लाभांश देणे १३-१४ | ०.०० |
| १८,२४०.०० | क्लोजिंग अलॉन्स | ०.०० |
| **०.००** | **बँक कर्ज** | **५९,४६,३५९.५०** |
| ०.०० | राजलक्ष्मी बँक ओडी | २२,००,०६८.५० |
| ०.०० | जनकल्याण बँक ओडी | ३७,४६,२९१.०० |
| ८,२८१.५५ | सिक्युर्ड लोन | ६,८२१.१९ |
| ०.०० | नाशिक मर्चन्ट बँक | १,१८२.०० |
| **३३,८८,३१५.४७** | **नफा** | **५४,०८,३१७.३२** |
| **१०,८७,०६,३४८.०४** | **एकुण** | **१५,१३,८५,७३५.१३** |

| ३१/०३/२०१६ | मालमत्ता व येणी | ३१/०३/२०१७ |
|---|---|---|
| २,७९,०७५.०० | रोख शिल्लक | ५३,६९६.०० |
| ५६,७१,६४८.०० | **बँक खाते** | १९,८९,८६७.१३ |
| ६,२९६.९८ | गणेश बँक करंट खाते | ०.०० |
| १,६२,५०७.०० | एन.डी.सी.सी बँक | २,१६,०५४.०० |
| ३,२९,५०८.६४ | गोदावरी बँक | ५,५०६.९० |
| ४,५४,३०९.७७ | स्टेट बँक ऑफ इंडिया | ४०,५९०.०२ |
| ११,१८,०५६.४४ | आयडिबीआय बँक बचत खाते | ३,८९,२४२.४४ |
| १,५३,८८६.०० | राजलक्ष्मी बँक करंट | ३१,७८३.०० |
| ९४,०५३.२१ | राजलक्ष्मी बँक बचत | १,३६,५१०.२१ |
| ३१,६५,४०१.०० | कोटक महिंद्रा बँक बचत | ५६,१८८.०० |
| ६०,२१०.०० | आयडिबीआय बँक करंट | ४५,६११.०० |
| १,२७,४१९.०० | नामको बँक करंट | ०.०० |
| ०.०० | जनकल्याण बँक करंट | ६,३७८.०० |
| ०.०० | एस बँक बचत | ९,८२,००३.५६ |
| ०.०० | एस बँक करंट | ८०,०००.०० |
| **३,६७,३४,३८५.००** | **गुंतवणुक** | **४,८०,५३,९४८.००** |
| ५००.०० | फेडरेशन शेअर्स | १,०००.०० |
| ०.०० | राजलक्ष्मी को ऑप बँक | ५०,००,०००.०० |
| १७,२८,३८५.०० | शिरपुर पिपल्स बँक | ०.०० |
| ५,०००.०० | एन.डी.सी.सी बँक | ५,०००.०० |
| ५०,००,०००.०० | श्री.समर्थ बँक | ७५,००,०००.०० |
| ५००.०० | श्री.गुरूजी रूग्णालय | ५००.०० |
| २,००,००,०००.०० | विश्वास को-ऑप बँक | १,५५,२५,०००.०० |
| १,००,००,०००.०० | पंजाब आणि महा बँक | ०.०० |
| ०.०० | जनकल्याण बँक | २,००,२२,,४४८.०० |
| **३७,१४,४७८.००** | **फंड गुंतवणुक** | **४६,४४,४७८.००** |
| ३७,१४,४७८.०० | एनडीसीसी रिझर्व्ह फंड | ४६,४४,४७८.०० |
| **५,८९,४५,९७६.००** | **कर्ज आणि ॲडव्हान्स** | **९,२६,३३,९३५.००** |
| २९,१७,१७८.०० | हायपोथिकेशन | १९,०७,५६९.०० |
| ९६,३१,९०७.०० | मुदत ठेव कर्ज | १,४९,५१,३८१.०० |
| ४,६२,७१,६९१.०० | टर्म लोन | ६,९१,८९,२५६.०० |
| ०.०० | हायपोसिसि कर्ज | १०,७६,४६३.०० |
| १,२५,२००.०० | पर्सनल लोन | १,४५,६०१.०० |
| ०.०० | हाउसिंग लोन | ५३,६३,६६५.०० |
| **६,२५,१०८.००** | **डेड स्टॉक** | **८,९९,६०३.००** |
| १५,००९.०० | लायब्ररी खाते | ०.०० |
| १,६७८.०० | डेड स्टॉक | १,५१९.०० |
| १,३३४.०० | कॉम्प्युटर सॉफ्टवेअर | २७,४८९.०० |
| ५,०४,५७७.०० | फर्निचर आणि फिक्चर्स | ५,८८,४३३.०० |
| १,०२,२३६.०० | कॉम्प्युटर /युपीएस/फॅक्स | २,८१,९८१.०० |
| २६५.०० | पीगमी मशीन | १८१.०० |
| **२७,३५,६७८.००** | **इतर देणे** | **३१,१०,२०८.००** |
| ५,००,०००.०० | ऑफिस डिपॉझिट | ५,००,०००.०० |
| ५,६००.०० | विमा देय | ५,७२०.०० |
| ८,३५,०११.०० | व्याज येणे गुंतवणुक | १२,०१,७०१.०० |
| ३५,१००.०० | टि.डी.एस ०९-१० | ३५,१००.०० |
| १,१५०.०० | टेलिफोन डिपॉझिट | १,१५०.०० |
| १३,३७,३१७.०० | कर्ज येणे | १३,३२,५३७.०० |
| २१,५००.०० | इंन्कम टॅक्स येणे ०८-०९ | २१,५००.०० |
| ०.०० | पगार ॲडव्हान्स | ५००.०० |
| ०.०० | इंन्कम टॅक्स १४-१५ | १२,०००.०० |
| **१०,८७,०६,३४८.०४** | | **१५,१३,८५,७३५.१३** |

# दिनांक ३१ मार्च २०१७ अखेरचा नफा तोटा पत्रक

| ३१/०३/२०१६ | एकुण खर्चाचा तपशिल | ३१/०३/२०१७ | ३१/०३/२०१६ | एकुण उत्पन्नाचा तपशिल | ३१/०३/२०१७ |
|---|---|---|---|---|---|
| ८३,३५,५६०.०० | दिलेले व्याज (ठेवीवरील) | १,०३,५१,४००.०० | ८६,६६,२४८.०० | मिळालेले व्याज (कर्जावरील) | १,०७,८०,३८६.०० |
| १२,८०४.०० | ओव्हर ड्राफ्टवर दिलेले व्याज (कर्जावरील) | ६३,९६६.०० | ३७,३१,५४३.०० | मिळालेले व्याज (मुदत ठेव/इतर) | ५४,८९,४२१.५६ |
| ४,१७,४७५.०० | पगार खर्च | ४,४६,८५४.०० | १,१३,९७२.०० | पिनल इंट्रेस्ट खाते | ८६,५७२.०० |
| ४१,८००.०० | बोनस+ अनुदान खर्च +टेबल अलाउंन्स+प्रवास खर्च | ८५,८२०.०० | ९,५६४.३७ | कमिशन खाते | १६,६५०.०० |
| | | | ५,२७,७७६.०० | विकास निधी/प्रोसेसिंग फि | १०,९७,८६७.०० |
| १३,९१४.०० | इंश्युरन्स फॉर स्टाफ | १३,३०४.०० | | | |
| २,५०० | प्रोफेशल टॅक्स | २,५००.०० | ३६,३९७.३९ | बँक चार्जेस | ०.०० |
| ४७,३७६.०० | सर्व्हिस चार्जेस | ०.०० | ०.०० | **इतर उत्पन्न** | **६४०.००** |
| ३,५१,९४४.०० | भाडे | ४,८०,०००.०० | | | |
| २३,५००.०० | म्युनसिपल टॅक्स | २३,५००.०० | | | |
| ३३,६२०.०० | ईलेक्ट्रीसाटी खर्च | ३९,२५०.०० | | | |
| १,०९,८४८.०० | घसारा | १,४२,२९५.०० | | | |
| ११,०९९.३९ | प्रिटिंग आणि स्टेशनरी | ५२,०२१.५१ | | | |
| ६७,५००.०० | ऑडिट फी खर्च | ६९,९९६.०० | | | |
| १८,०००.०० | टॅक्स ऑडिट खर्च | १५,०००.०० | | | |
| ३,१७२.०० | पोस्टेज खर्च | १,२२५.०० | | | |
| १९,९९६.०० | टेलिफोन खर्च | २३,९९१.०० | | | |
| ४,७३६.०० | वार्षिक सर्वसाधारण सभा | १८,२८०.०० | | | |
| २१,७४४.०० | किरकोळ खर्च | ६०,४१९.०० | | | |
| ०.०० | बँक चार्जेस | ६,१२८.७३ | | | |
| १०,०२८.०० | टायपिंग व झेरॉक्स | १०,४६७.०० | | | |
| ६९,०५०.०० | जाहिरात खर्च | ४७,५००.०० | | | |
| ५,०००.०० | शिक्षण निधी | ५,०००.०० | | | |
| २,६८०.०० | लिगल खर्च | ७,११४.०० | | | |
| ५,५४१.९० | प्रिमीयम इंन्शुरन्स खर्च | ५,६८०.०० | | | |
| २२,४७५.०० | ॲडमेनीस्ट्रेटीव्ह खर्च | ५६,४११.०० | | | |
| ०.०० | वर्धापन दिन खर्च | ३,३३७.०० | | | |
| १३,८४०.०० | रिपेअरिंग ॲण्ड मेन्टेनन्स | ८,८६०.०० | | | |
| ११,५१२.०० | रिबेट खर्च | ०.०० | | | |
| २,२३०.०० | शॉपॲक्ट खर्च | ०.०० | | | |
| १८,२४०.०० | क्लोजिंग अलांउन्स | ०.०० | | | |
| ०.०० | देणगी खर्च | १३,५०९.०० | | | |
| ०.०० | निवडणुक खर्च | ९,३९१.०० | | | |
| **३३,८८,३१५.४७** | **नफा** | **५४,०८,३१७.३२** | | | |
| **१,३०,८५,५००.७६** | | **१,७४,७१,५३६.५६** | १,३०,८५,५००.७६ | | १,७४,७१,५३६.५६ |

## अंदाज पत्रका पेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी

| तपशिल | २०१६-२०१७ चा अंदाज | २०१६-२०१७ चा प्रत्यक्ष खर्च | जास्त झालेला खर्च |
|---|---|---|---|
| मिळणारे व्याज | १,००,००,०००.०० | १,०७,८०,३८६.०० | - |
| इतर उत्पन्न | ५५,००,०००.०० | ६६,९१,१५१.०० | - |
| एकुण उत्पन्न | १,५५,००,०००.०० | १,७४,७१,५३६.५६ | - |

## खर्चाचा तपशिल

| | | | |
|---|---|---|---|
| ठेवीवरील व्याज | ९५,००,०००.०० | १,०३,५१,४००.०० | ८,५१,४००.०० |
| सेवकांचा पगार+टेबल अलान्स+ बोनस खर्च+ प्रवास खर्च | ६,७०,०००.०० | ५,३२,६७४.०० | - |
| बँक चार्जेस कमिशन | ५,०००.०० | ६,१२८.७३ | १,१२८.७३ |
| टेलिफोन खर्च | ३५,०००.०० | २३,९९१.०० | - |
| ऑडिट खर्च/अंतर्गत ऑडीट फि | १,००,०००.०० | ६९,९९६.०० | - |
| लाईट बिल | ४५,०००.०० | ३९,२५०.०० | - |
| प्रिंटिंग आणि स्टेशनरी | ५०,०००.०० | ५२,०२१.५१ | २,०२१.५१ |
| शिक्षण निधी | ५,०००.०० | ५,०००.०० | - |
| जनरल मिटिंग खर्च | ५०,०००.०० | १८,२८०.०० | - |
| घसारा | १,५०,०००.०० | १,४२,२९५.०० | - |
| लिगल खर्च/जाहिरात खर्च | १,००,०००.०० | ५४,६१४.०० | - |
| विमा संस्था | १०,०००.०० | ५,६८०.०० | - |
| इतर खर्च (किरकोळ खर्च) | ३५,०००.०० | ६०,४१९.०० | २५,४१९.०० |
| टाईपिंग व झेरॉक्स | २०,०००.०० | १०,४६७.०० | - |
| ऑफिस भाडे/सर्व्हीस चार्जेस/ घरपटटी | ५,५०,०००.०० | ५,०३,५००.०० | - |
| मिटिंग खर्च/ॲडमेनेस्ट्रेटिव्ह खर्च | ३५,०००.०० | ५६,४११.०० | २१,४११.०० |
| रिबेट | ३५,०००.०० | ०.०० | - |
| रिपेरिंग मेंन्टेन्स | २५,०००.०० | ८,८६०.०० | - |
| ओव्हर ड्राफ्टवर दिलेले व्याज | १,००,००००.०० | ६३,९६६.०० | - |
| स्टाफ इंन्शुरन्स | १५,०००.०० | १३,३०४.०० | - |
| सॉफ्टवेअर मेन्टेन्स | २०,०००.०० | ०.०० | - |
| टॅक्स ऑडिट फि | २०,०००.०० | १५,०००.०० | - |
| एनपीए प्रोव्हीजन | ३,००,०००.०० | ०.०० | - |
| रिकव्हरी चार्जेस | ५,०००.०० | ०.०० | - |
| क्लिअरींग चार्जेस | २,०००.०० | ०.०० | - |
| पोस्टेज खर्च | १५,०००.०० | १,२२५.०० | - |
| वर्धापन दिनखर्च | ५०,०००.०० | ३,३३७.०० | - |
| प्रोफेशनल खर्च | २,५००.०० | २,५००.०० | - |
| सभासद कल्याण निधी | १५,०००.०० | ०.०० | - |
| निवडणुक खर्च | ०.०० | ९,३९१.०० | ९,३९१.०० |
| डोनेशन खर्च | ०.०० | १३,५०९.०० | १३,५०९.०० |
| एकुण | १,१९,८४,५००.०० | १,२०,६३,२१९.२४ | - |
| निव्वळ नफा/तोटा | ३५,१५,५००.०० | ५४,०८,३१७.३२ | - |
| **एकुण** | **१,३०,००,०००.००** | **१,७४,७१,५३६.५६** | - |

# अंदाज पत्रक

| तपशिल | २०१६-२०१७ चा अंदाज | २०१६-२०१७ चा प्रत्यक्ष खर्च | २०१७-२०१८ चा अंदाज |
|---|---|---|---|
| मिळणारे व्याज | १,००,००,०००.०० | १,०७,८०,३८६.०० | १,४०,००,०००.०० |
| इतर उत्पन्न | ५५,००,०००.०० | ६६,९१,१५१.०० | ७५,००,०००.०० |
| एकुण उत्पन्न | १,५५,००,०००.०० | १,७४,७१,५३६.५६ | २,१५,००,०००.०० |

## खर्चाचा तपशिल

| | | | |
|---|---|---|---|
| ठेवीवरील व्याज | ९५,००,०००.०० | १,०३,५१,४००.०० | १,२०,००,०००.०० |
| सेवकांचा पगार+टेबल अलान्स+ बोनस खर्च+ प्रवास खर्च | ६,७०,०००.०० | ५,३२,६७४.०० | ६,९५,०००.०० |
| बँक चार्जेस कमिशन | ५,०००.०० | ६,१२८.७३ | १०,०००.०० |
| टेलिफोन खर्च | ३५,०००.०० | २३,९९१.०० | ३५,०००.०० |
| ऑडिट खर्च/अंतर्गत ऑडीट फि | १,००,०००.०० | ६९,९९६.०० | १,२५,०००.०० |
| लाईट बिल | ४५,०००.०० | ३९,२५०.०० | ७५,०००.०० |
| प्रिंटिंग आणि स्टेशनरी | ५०,०००.०० | ५२,०२१.५१ | १,००,०००.०० |
| शिक्षण निधी | ५,०००.०० | ५,०००.०० | ५,०००.०० |
| जनरल मिटिंग खर्च | ५०,०००.०० | १८,२८०.०० | १,००,०००.०० |
| घसारा | १,५०,०००.०० | १,४२,२९५.०० | ३,००,०००.०० |
| लिगल खर्च/जाहिरात खर्च | १,००,०००.०० | ५४,६१४.०० | १,००,०००.०० |
| विमा संस्था | १०,०००.०० | ५,६८०.०० | २०,०००.०० |
| इतर खर्च (किरकोळ खर्च) | ३५,०००.०० | ६०,४१९.०० | १,००,०००.०० |
| टाईपिंग व झेरॉक्स | २०,०००.०० | १०,४६७.०० | २५,०००.०० |
| ऑफिस भाडे/सर्व्हीस चार्जेस/ घरपटटी | ५,५०,०००.०० | ५,०३,५००.०० | ९,००,०००.०० |
| मिटिंग खर्च/ॲडमेनेस्ट्रेटिव्ह खर्च | ३५,०००.०० | ५६,४११.०० | ७५,०००.०० |
| रिबेट | ३५,०००.०० | ०.०० | ५०,०००.०० |
| रिपेरिंग मेंन्टेन्स | २५,०००.०० | ८,८६०.०० | २५,०००.०० |
| ओव्हर ड्राफ्टवर दिलेले व्याज | १,००,००००.०० | ६३,९६६.०० | १,००,०००.०० |
| स्टाफ इंन्शुरन्स | १५,०००.०० | १३,३०४.०० | २०,०००.०० |
| सॉफ्टवेअर मेन्टेन्स | २०,०००.०० | ०.०० | २५,०००.०० |
| टॅक्स ऑडिट फि | २०,०००.०० | १५,०००.०० | २०,०००.०० |
| एनपीए प्रोव्हीजन | ३,००,०००.०० | ०.०० | ३,००,०००.०० |
| रिकव्हरी चार्जेस | ५,०००.०० | ०.०० | ५,०००.०० |
| क्लिअरींग चार्जेस | २,०००.०० | ०.०० | २,०००.०० |
| पोस्टेज खर्च | १५,०००.०० | १,२२५.०० | १५,०००.०० |
| वर्धापन दिनखर्च | ५०,०००.०० | ३,३३७.०० | ५०,०००.०० |
| प्रोफेशनल खर्च | २,५००.०० | २,५००.०० | २,५००.०० |
| सभासद कल्याण निधी | १५,०००.०० | ०.०० | १५,०००.०० |
| निवडणुक खर्च | ०.०० | ९,३९१.०० | ०.०० |
| डोनेशन खर्च | ०.०० | १३,५०९.०० | २५,०००.०० |
| शाखा उदघाटन खर्च | ०.०० | ०.०० | ४,००,०००.०० |
| एकुण | **१,१९,८४,५००.००** | **१,२०,६३,२१९.२४** | **१,५७,१९,५००.००** |
| निव्वळ नफा/तोटा | **३५,१५,५००.००** | **५४,०८,३१७.३२** | **५७,८०,५००.००** |
| **एकुण** | **१,३०,००,०००.००** | **१,७४,७१,५३६.५६** | **२,१५,००,०००.००** |

## महत्त्वाच्या सुचना

१. सभासदांनी के.वाय.सी नियमानुसार फोटो, फोटो आय.डी, पॅनकार्ड रहिवासी पुरावा दिलेला नसल्यास त्वरीत संस्थेस द्यावा.
२. सभासदांनी आपला पत्ता बदलला असल्यास त्वरीत संस्थेस कळवावा.
३. संस्थेस ठेवी ठेवून स्वार्थ अ ाणि परमार्थ दोन्ही साधा.
४. आपण वारस नेमला असल्यास त्याची नोंद करण्यासाठी संस्थेत लेखी कळवा व वारसाची नोंद करून घ्या.
५. आपले कर्ज व कर्जाचे हफ्ते व व्याज मुदतीत वेळच्य ा वेळेवर संस्थेत भरून सहकार्य कराव व आपण जामिन असलेल्या कर्जदाराने कर्जाचे हफ्ते अगर रक्कम वेळेवर भरली आहे किंवा नाही याची कृपया दक्षता घ्या. ज्या कारणासाठी कर्ज घेतले असेल, त्यासाठीच त्याचा विनियोग करावा.
६. वेळोवेळी कर्जफेड केल्यास त्याचा लाभ आपल्यासारखा अन्य गरजु सदस्यांना होईल हे नेहमी लक्षात ठेवावे.
७. सर्व सभासदांना विनंती की, आपले सर्व व्यवहार आपल्या संस्थेतुन करावेत, सर्व मुदत ठेवींवर सहकारी बँक व राष्ट्रीयकृत बँकापेक्षा जास्त व्याजदर देण्यात येत आहे.
८. आपला डिव्हीडं (लाभांश) जमा करण्यासाठी आपले बचत खाते (सेव्हींग) पतसंस्थेत उघडून लाभांश त्वरीत मिळावा.
९. कर्ज मंजुरीतील विलंब टाळण्यासाठी कर्ज मागणी अर्जातील संपुर्ण माहिती अचुक भरावी. तसेच त्यासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडावी म्हणजे कर्ज मंजुर करणे सुलभ होईल.
१०. सभासदांनी आपले शेअर्स सर्टिफिकेट संस्थेतुन घेउन जावे.
११. संस्थेचे यशाचे मानकरी आपण आहात. आपण संस्थेच्या विकासासाठी सहकार्य करावे हिच आग्रहाची विनंती.
१२. आपल्या बहुमोल व सुचना व तक्रारी लेखी स्वरूपात संस्थेच्या कार्यालयात किंवा तक्रार पेटीत द्याव्यात.

**परिशिष्ट अ**

| | | |
|---|---|---|
| संस्थेचे नाव | : | निर्मिती नागरी सहकारी पतसंस्था मर्या,.नाशिक. |
| पत्ता | : | गाळा नं.२/३, विकास थिएटर बिल्डींग, तळमजला, अशोकस्तंभ नाशिक-४२२००२. |
| नोंदणी दिनांक व क्रमांक | : | एन.एस.के./आर.एस.आर/सी.आर/१६९८/९९ दिनांक-२३/०४/१९९९. |
| तपशिल | : | दिनांक ३१ मार्च २०१७. |
| सभासद संख्या (अ वर्ग) | : | ६६५ |
| नाममात्र | : | |
| अधिकृत भागभांडवल | : | १,००,००,०००.०० |
| वसुल भागभांडवल | : | ५२,८३,०५०.०० |
| राखीव निधी | : | ४७,२३,७७०.०१ |
| इतर निधी | : | ७६,३५,३४७.६८ |
| ठेवी | : | ११,७६,९५,०८९.६३ |
| कर्जे | : | ९,२६,३३,९३५.०० |
| खेळते भांडवल | : | १५,१३,८५,७३५.१३ |
| गुंतवणुक | : | ४,८०,५३,९४८.०० |
| एनपीए | : | ३.४३% |
| कॉस्ट ऑफ डिपॉफिट | : | |
| कॉस्ट ऑफ मॅनेजमेंट | : | |
| सि.डी.रेशो | : | |
| नफा | : | ५४,०८,३१७.३२ |
| सेवक वर्ग | : | ०३. |
| ऑडिट वर्ग | : | अ वर्ग |

श्री.अजय नंदलाल राठी

चार्टड अकांन्टट

## वैधानिक लेखापरिक्षकांचा अहवाल

१. आम्ही निर्मिती नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित नाशिक या संस्थेच्या सोबत जोडलेल्या ३१ मार्च २०१७ या दिनांकाचा ताळेबंद व सन २०१६-२०१७ या सहकारी वर्षाचे नफा तोटा पत्रक तपासले आहे.

२. या आर्थिक पत्रकाची जबाबदारी संस्था संचालक व व्यवस्थापन यांची असून आमची जबाबदारी या आर्थिक पत्रकाबाबत लेखी परिक्षणाधारे मत व्यक्त करणे हि आहे.

३. आम्ही आमचे लेखा परिक्षण भारतामध्ये सर्व सामान्यपणे मान्यताप्राप्त असलेल्या लेखापरिक्षेण मानकांना अनुसरून केले आहे. ज्यानुसार सदरच्या आर्थिक पत्रकामध्ये गंभीर दोष नाहित, याची खात्री करण्यासाठी आवश्यक असलेले लेखापरिक्षणाचे नियोजन व कार्यवाही केली जाते.

४. आर्थिक पत्रकातील रकमा व प्रकटन यांचे चाचणी परिक्षण, हिशोब तत्वे व महत्त्वाचे अंदाज यांचे परिक्षण व सर्वसाधारण आर्थिक पत्रकांचे सादरीकरण यांचे मुल्यमापन या सर्वाचा लेखापरिक्षणामध्ये समावेश होतो.

५. आमचा विश्वास आहे की, आमचे मत व्यक्त करण्यासाठी योग्य आधार पुरवते.

६. आमच्या मते व आम्हाला मिळालेल्या माहिती व खुलाशाच्या आधारे.

७. आम्ही (अ) महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा कलम ८१ (५-ब) त्याखालील नियम ६९ या अन्वये (ब) सहकार आयुक्त व निबंधक यांचे परिपत्रक क्र.अेडीटी/लेप/रचना १९९७, दिनांक प्रमाणेच्या सोबतच्या सविस्तर अहवालातील विशेषत: भाग अ, ब व क यामधील शेरे व सुचना यास राहुन, अहवाल सादर करतो की,

   १. आमच्या मते संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्थेचा कायदा, नियम व संस्थेचे पोटनियमास अनुसरून आवश्यक असणारी हिशेब पुस्तके योग्य रितीने ठेवलेली आहेत.

   २. आमच्या लेखा परिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरूर ती सर्व माहिती व खुलासे आम्हांला उपलब्ध झाले आहेत.

   ३. आमच्या निरिक्षणात संस्थेचे व्यवहार हे संस्थेच्या आखत्यारितील आहेत.

   ४. आमच्या निरिक्षणात संस्थेने तयार केलेला ताळेबंद व नफा तोटा पत्रक संगणीकृत हिशेबी पुस्तकांशी जुळते.

८. वर अल्लेख केलेल्या अहवालातील विशेषत: भाग अ, ब व क यामधील शेरे व सुचना यास पात्र राहून

   अ. दिनांक ३१/०३/२०१७ चे संस्थेने तयार केलेले ताळेबंद पत्रक संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची सत्य व वास्तविक स्थिती दर्शवते.

   ब. दिनांक ३१/०३/२०१७ अखेरचे नफा तोटा पत्रक त्या दिनांकास संपणा-या वर्षाच्या नफ्याची सत्य व वास्तविक स्थिती दर्शवते.

९. सन २०१६-२०१७ या वर्षासाठी संस्थेस लेखा परिक्षण वर्ग अ देण्यात आलेला आहे.

श्री.अजय नंदलाल राठी

चार्टड अकांन्टट